म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७८१.

# सुमन-माळ.

REFBK-0018504
REFBK-0018504

कवयित्री सौ. लक्ष्मीबाई वेहेरे.

# सुमन-माळ.

कवयित्री सौ. लक्ष्मीबाई बेहेरे.



REFBK-0018504

REFBK-0018504

कवयित्री कै. सौ. लक्ष्मीबाई बेहेरे.

जन्म १८९६ देहावसान १९१४

The Bombay Art Printing Works, Fort.

वा. काव्य ३१८
दा. क. १८५०७

# दोन शब्द.

माझ्या प्रिय पत्नीच्या प्रेमळ हास्यानें उत्पन्न झालेली हीं सुमनें मला अत्यंत प्रिय वाटत असली, तर त्यांत नवल कोणतें ? तें प्रेमळ हास्य नेत्रासमोर चमकतां चमकतां अज्ञाताच्या गाढ अंधकारांत लुप्त झालें; पण त्या हास्यानें फुललेलीं हीं सुमनें त्या स्वर्गीय हास्याची मला क्षणोक्षणीं आठवण करून देत आहेत. ही सुमनें इतस्ततः विखरली होती, ती मी नीट एका जागीं जमवून त्यांची माळ गुंफीत आहे. ही माळ माझ्याजवळ असल्यानें मी आपल्या कल्पनाराज्यांत तें प्रेमळ हास्य उत्पन्न करून आपली तहानभूक विसरून जातो. माझें मन प्रेमाशीं तल्लीन होतें.

जिचीं फुलें तिनें गुंफावी हें खरें ! पण काळाची तशी इच्छा नसल्यामुळें हें काम माझ्यावर पडलें. वेलीला चारदोन फुलें लागावीत व आतां तिला फार जोरानें बहर येईल, व फुलणाऱ्या फुलांच्या सुवासानें उद्यानांतील भृंग गुंगून जातील, अशी अपेक्षा जग करीत असतां, एकाएकीं वीज कडाडून वेली जागच्या जागींच सुकून जावी, अशी करणी काळाकडून कधीं कधीं या जगांत होत असते, त्याचाच हाही एक मासला झाला.

माझ्या प्रियपत्नीचें शाळेंतील शिक्षण मुळींच झालें नव्हतें. कारण ती शाळेंत कधींच गेली नाहीं. पण प्रगल्भ व सुसंस्कृत मन या दृष्टीनें तिची योग्यता फार मोठी होती व तिच्या उच्च विचारांचा नमुना तिच्या सुमनमाळेंतून रसिकांना खास सांपडूं शकेल. मोरोपंताची कविता तिला अतिशय आवडत असे व तिचा त्या दृष्टीनें अभ्यासही चालला होता. टेनीसनच्या कवितांतील गाणीं तिला अत्यंत आवडत व तिनें त्या पैकीं बरीचशी पाठही करून ठेविली होती.

'Sweet and low, Sweet and low, wind of the western sea' हें गाणें तर ती आपल्या आजारांत देखील सारखें गुणगुणत असे.

Emotion and Imagination are the two wheels of poetry ! उमाळा आणि कल्पना ही दोन काव्याची प्रमुख अंगे आहेत. फुलासारखे वाऱ्याच्या झुळुके बरोबर कंपित होणारें हृदय व जीर्ण झोपडीला प्रासाद समजून स्वर्गसुख भोगणारें मन या दोघांच्या संगमानंतर खऱ्या काव्याशिवाय दुसरें काय बाहेर पडणार ? माझ्या प्रिय पत्नीच्या हास्यांतून स्फुरणाऱ्या सुमनांत मला मूर्तिमंत काव्य दृग्गोचर होत आहे. कदाचित् माझ्या प्रेमामुळें माझी दृष्टि पक्षपात करावयास शिकली असेल, तेव्हां इतरांस काय वाटेल तें खरें !

अठराव्या वर्षी या जगाचा त्याग करून परलोकीं जाणाऱ्या माझ्या प्रियपत्नीनें विपुल व अप्रतीम सुंदर काव्यरचना केली असेल, अशी कोणीच अपेक्षा करणार नाहीं. कारण हृदय कितीही काव्यमय असले

तरी हृदय निवेदनाला कांहींतरी काळ व अनुभव हा लागणारच ! तिनें लिहीलेलीं बहुतेक सुमनें या माळेंत गुंफिली आहेत. अगदीं लहानपणीं लिहीलेल्या दोन तीन कविता मला अगदींच साध्या वाटल्या ह्मणून, त्यांचा या माळेंत समावेश केला नाहीं. यापैकीं बहुतेक व इतरही एक दोन कविता मनोरंजन, आनंद, प्रभात वगैरे मासिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. पण त्या सर्व एका जागीं असाव्यात या इच्छेनेंच प्रस्तुत माळ गुंफिली आहे.

आपल्या पत्नीच्या कवितांना प्रस्तावना लिहीण्याचा प्रसंग व तोही तिच्या मृत्युनंतर—चमत्कारिक तर खराच ! पण त्यामुळें मी आपल्या गुरुदक्षिणेच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त झाल्याचें समाधान माझ्या मनाला होत आहे. कारण तिची पहिली कविता वाचूनच माझी स्फूर्ति जागृत झाली व माझ्या हातून घडलेली अल्प वाङमय—सेवा ही तिच्या प्रेमळ संगतीचेच फळ होय, अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे.

**नारायण केशव बेहेरे.**

# अनुक्रमणिका. *


| | | |
|---|---|---|
| १ | प्रियकरा ! ... ... ... ... | १ |
| २ | उद्यान—अथवा प्रीतीचें साम्राज्य. ... | ४ |
| ३ | ना कळे ! ... ... ... ... | ६ |
| ४ | रामाचा हट्ट. ... ... ... ... | ७ |
| ५ | गवती फूल आणि जाई. ... ... | ९ |
| ६ | ताईस. ... ... ... ... | १२ |
| ७ | आनंद कोणाला आवडत नाहीं ? ... ... | १४ |
| ८ | स्वप्नाचा पडताळा. ... ... ... | १६ |
| ९ | प्रेमाची बाग. ... ... ... | १९ |
| १० | कोती दृष्टि ! ... ... ... | २२ |
| ११ | श्रेष्ठ कोण—धरा कीं स्वर्ग ? ... ... | २४ |


* कविता कालाच्या अनुक्रमानें दिल्या आहेत. यावरून कवयित्रीच्या विचारांत दिवसेंदिवस घडत असलेली प्रगती कोणाच्याही लक्षांत येईल. जर सुदैवानें तिच्या आयुष्याची दोरी थोडी लांबली असती तर काव्य-वाङ्मयांत तिनें चांगलीच भर टाकली असती असें अनुमान करावयास जागा आहे.

# अर्पण पत्रिका.



हीं माळ जर तुझी तूंच गुंफिली
असती तर माझ्याशिवाय
ती तूं कोणाला अर्पण
केली असतीस?

ना. के. बेहरे.

The Bombay Art Printing Works, Fort.

वा. काव्य
३२८
१९५०४

# सुमन-माळ.

## प्रियकरा ! *

( चाल--नृपममता रामावरती. )

अपराध काय मी केले ?
कां त्यजुनी जाणें झालें ॥ प्रियकरा ॥
सोडुनी सर्व रागातें
पाठवा प्रेम-पत्रातें ॥ प्रियकरा ॥
जो प्रेम-तरू लावियला ॥
सुकुनि कां आज तो गेला ॥ प्रियकरा ॥
सिंचुनी प्रेम-जल वर तें ।
वाढवा तया वृक्षातें ॥ प्रियकरा ॥

* माझें पत्र बरेंच दिवसांत न मिळाल्यामुळें ही कविता पत्रद्वारें मजकडे आली. आपल्या नांवावर ही कविता प्रसिद्ध व्हावी, अशी त्या वेळीं कवयित्रीची इच्छा नसल्यामुळें ती माझ्या नांवावर चित्रमयजगतांत प्रसिद्ध झाली.

चाल—निशिदिनीं
चैन ना मनीं
ह्मणुनि यां दिनीं
पत्रिका लिहिते । पत्रिका लिहिते
येउंद्या प्रेम-पत्रातें ! ॥ प्रियकरा ॥ १ ॥

वृक्षास लता ही पाही
आलिंगन देउनि राही ॥ प्रियकरा ॥

चंद्रिका कधीं चंद्राला
वा प्रभा त्यजी मित्राला ? ॥ प्रियकरा ॥

चंचला जरी ही चपला
भेटते पुन्हा मेघाला ॥ प्रियकरा ॥

सागरा सोडि जी सरितां
शोभवी कोणत्या जगता ? ॥ प्रियकरा ॥

चाल—एकली
इथें राहिली
बहुत आपली
काळजी करिते । काळजी करिते
येउंद्या प्रेम-पत्रातें ॥ प्रियकरा ॥ २ ॥

अंबरीं पहा वा भुवनीं
स्त्री–पुरुष राहती मिळुनी ॥ प्रियकरा ॥
जर नियम कळे जगताचा
कां राग असा अबलेचा ? ॥ प्रियकरा ॥
आपल्या मतें अपराधी
मागते क्षमा मी आधीं ॥ प्रियकरा ॥
आपणाविना मी कोणा
सांगाहो जाऊं शरणा ? ॥ प्रियकरा ॥

चाल—अंतरी
मूर्ति जी धरी
करो मजवरी
प्रेम, विनवीतें । प्रेम, विनवीतें
येउंद्या--प्रेम पत्रातें ॥ प्रियकरा ॥ ३ ॥

# उद्यान

अथवा

# प्रीतिचें साम्राज्य.

( चाल—भूपती खरे ते. )

दिवस तो स्मरे मज पूर्णपणें गे ताई
उद्यानीं फिरण्या एके दिवशीं जाई ॥ धृ० ॥

तुज शोभा सांगूं तेथिल कोण्या बोलें
आनंदें वाटे बाग सर्व तो डोले !

चाल—शोभती वृक्ष चहुं बाजूं । साजिरे
कारंजे खुललें तेथें । गोजिरें
चुंबिती लता-कुंजाना । मोगरे
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई
उद्यानीं फिरण्या एके दिवशीं जाई ॥

[ २ ]

हीं सुंदर सुमनें हास्यमुखानें बघती
या लता तरूंना आलिंगुनिया धरिती
चाल—वृक्षावरि पक्षिकुलें तीं । येउनी
आनंदित करित जनाला । गाउनी
तीं त्यांचीं मंजुळ गीतें । ऐकुनी
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई
उद्यानीं फिरण्या एके दिवशीं जाई ॥

[ ३ ]

हा गुलाब फुलला सुंदरसा बागेंत
बहु मोद मनाला मधुर सुगंधें देत
चाल—हे मधुकर काळे तेथें । येउनी
पुष्पांतिल मधुर रसातें । प्राशुनी
बागडती स्वैरपणें तें । पाहुनी
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई
उद्यानीं फिरण्या एके दिवशीं जाई ॥

# ना कळे !

( चाल—नृपममता रामावरती. )

या जलांत लपल्या कमला
मधु गंध कुणी गे दिधला ? ॥ ना कळे ॥
नाभींत मृगाच्या राही
कस्तुरी कशी ती बाई ? ॥ ना कळे ॥
वेडावी कोकिल--गान--
मधुर कंठ देई कोण ? ॥ ना कळे ॥
दावुनी नील मेघांना
नाचवी कोण मयुरांना ? ॥ ना कळे ॥
रविचंद्र अखिल हे तारे--
निर्मिलें कुणी जग सारें ? ॥ ना कळे ॥
हा देह—कशी मी झाले
कोठुनी भूवरी आले ? ॥ ना कळे ॥
कोणाची होते बाळा
घातली कुणा कशि माळा ? ॥ ना कळे ॥
‘ चालक तो देव जगाचा ’
परि अर्थ मला देवाचा ॥ ना कळे ॥
अज्ञान पुरी मी वेडी
सुटतील कशीं हीं कोडीं ? ॥ ना कळे ॥

वा. काव्य ३१८

# रामाचा हट्ट. *

( चाल—भूपती खरे ते. )

कार्तीक पौर्णिमा रम्य निशा समयाला
कौसल्या दावी पूर्ण चंद्र रामाला
चंद्रमा पाहुनी रामचंद्र हे हंसले
खेळण्या चंद्र दे हट्ट धरोनी बसले

चाल—समजावी माता त्याला । बहुपरी
मग मुरली वाजविण्याला । दे करीं
परि तृप्ती नच रामाला । लवभरी
'सोनुल्या, उगी तूं सुबक बाहुली घेई'
'बाहुली नको जा—चंद्र खेळण्या देई' ॥

---

* रीडर मधील Rama and the Moon च्या गोष्टीच्या आधारें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. १९५०४
म. ७ काव्य (स्थळ प्रत)

[ २ ]

'मज चंद्र खेळण्या देई' ऐसें बोले
खेळणें फेकुनी गडबड भूवर लोळे
बहु समजुत करिती खेळ देउनी नाना ॥
ना क्षणभर थांबे रामचंद्र रडतांना
चाल—अंकावर माता त्याला । घेउनी
पाचारी प्रिय नाथाला । धाडुनी
सेवक, तो सत्वर गेला । धांवुनी
तो जाउनि सांगे सर्व वृत्त राजाला
मग दशरथ राजा झडकरि तेथें आला

[ ३ ]

कुरवाळी राजा हृदयीं धरूनी त्यासी
"तुज काय जाहलें? सांग असा कां रडसी?
आकाश फोडुनी चंद्रसूर्य तुजसाठीं
आणीन खेळण्या; मग कां होसी कष्टी"
चाल—'द्यां मला चंद्र खेळाया । आणुनी'
आरसा आणवी राया । त्यांतुनी
चंद्राची मग त्या छाया । दाउनी
आनंदित केले रामाला राजानें
प्रतिबिंब पाहुनी नाचे तो हर्षानें!

# गवती फूल आणि जाई.

( दिंड्या. )

वधू रजनी नव बघुनि रविपतीला
जणूं लपली सोडुनी खेळण्याला !
सखी गेली पाहुनी दिव्य तारा
हंसत जाती सोडुनी खेळ सारा !

[ २ ]

भृंग गुंगे पाहुनी नवकलीला
विहग सामोरे जाति दिनकराला
हर्षयुक्ता खेळती सुमन-माला
तटिनि जाती पाहण्या सागराला !

[ ३ ]

अशा वेळीं मी मुदित होउनीया
वसे उद्यानीं पुष्प घेउनीया !
श्रवाणिं माझ्या मग गोड शब्द आले
कोण बोले, हें पाहण्यास गेले !

[ ४ ]

गवति पुष्पाला वदे रम्य जाईः—
" किती सुंदर मम मृदुल तनू पाही !
रंग माझा पाहुनी चंद्र डोले
भृंग प्रेमें मजसवे हसे खेळे !

[ ५ ]

" किती शोभा मी देत उपवनाला
नित्य रिझवीते रसिक–जन–मनाला !
कथा प्रणयाच्या मधुर करी त्याशीं
ह्मणुनि रमणी खोंविती केशपाशीं ! "

[ ६ ]

" सखे अससी तूं रम्य फार जाई
तुझ्या गंधें डोलती दिशा दाही !
असे साधे मी रूप–गंध–हीन
परी ईशाच्या पदीं सदा लीन !

[ ७ ]

“ खेळसी तूं घेउनी सवे भृंग
विश्व–लीला मी बघुनि होत दंग !
मर्त्य भुलती तुज; भुलसि तूं तयाशीं
परी खेळे मी खेळ अमर्त्यांशीं !

[ ८ ]

“ कसा आवडतो तुला बंदिवास ?
रमणिपाशीं कां सुखें करिशि वास ?
असे सोन्याची सुबक जरि बेडी
तुझ्या मनिचें स्वातंत्र्य परी तोडी !

[ ९ ]

“ तुझ्या रूपां मोहुनी तोडतील
गलित होतां तुज पुन्हा त्यागितील !
नमन देवा मी करी सर्वकाळ
सुको, राहो वा त्रासवी न काळ ! ”

[ १० ]

गवति पुष्पाचें वचन ऐकुनी तें
बोध झाला त्या क्षणीं मन्मनातें !
‘ बाह्य सुंदरता क्रमें नष्टणारी
देवनिष्ठा परि अमर राहणारी ! ’

# ताईस- *

( चाल—बा नीज गडे. )

प्रिय भगिनी तूं रुसलिस कां मजवरती ?
नच येती पत्रें तव तीं
बहु प्रेमानें खेळ खेळलों नाना
बालपणीं--आठवते ना ?
जरि रुसले मी, कारण नसतां कांहीं
समजविशी किति तूं ताई !
किति हौसेनें फुलझाडे लावोनी
घातले बरोबर पाणी !
चाल—बाहुलिचें चुंबन घेतां
निज हृदयीं कुरवाळीतां
धांवत ये प्रेमळ माता

---

* प्रस्तुत प्रत्र कवयित्रीनें आपली प्रिय भगिनीतुल्य मैत्रीण सौ. सुशीलाताई कर्णीक यांना लिहीलें होतें.

ती दोघींना घेई हृदयाजवळीं
आनंदें अश्रू ढाळी !
बहु दिवसांनी लग्न तुझें मग झालें
पति-रत्न तुला सांपडलें !
माता बाहुलिची खेळांतिल तूं ताई
झालीस खरोखर आई !
निज बाळांच्या बघतां प्रेमळ लीला
विसरलीस कां गे मजला !
नच दिसतां मी बालपणीं क्षण तुजला
शोधाया येशी मजला !

चाल—त्या बालपणीच्या लीला
आठवतां ताई मजला
वाटतें नवल चित्ताला !
तुज विसर पडे कैसा या भगिनीचा ?
कां महिमा हा काळाचा !

# आनंद कोणाला आवडत नाहीं ? *

( चाल---चंद्रकांत राजाची )

आनंदावर प्रेम अतीशय असलें तरि त्यांत
नवल कोणतें ? दुःख आवडे कोणा जगतांत ?
आनंदाची असे भुकेली पृथ्वी ही अपुली
अपवाद कशी या नियमाला राहिल ही दुबळी ?
जग--रूढीला सोडुनि जाणें शोभे वीरांना
कसें खुलावें परि तें जगतीं आह्मा अबलांना ?
आह्मी वेड्या अशाच राहूं आनंदीं लीन
स्वतंत्रतेच्या नव्या कल्पना धालों पाहून ।

---

* कवयित्रीला एका मैत्रिणीनें 'तुमचें आनंदावर फार प्रेम आहे' असें ह्मटलें. त्याला उत्तर ही कविता लिहिली गेली.

[ २ ]

आनंदावर प्रेम अतीशय असलें तरि त्यांत
नवल कोणतें ? बाळ नावडे कोणा जगतांत ?
प्रेमळतेचें दृश्य दावितें मुद्रा निष्कपटी
साठीपेक्षां गोड नसे कां बाळाची आठी !
जगताचा कटु अनुभव नाहीं ज्याच्या हृदयाला
कोण जगीं या भुले न बघतां शुभ्र आरशाला ?
खुळी वरी मी, बोल बोबडे बोलिन बाळाशीं
ज्ञानजल्पना तुमच्या चालू द्याच पंडिताशीं !

[ ३ ]

आनंदावर प्रेम अतीशय असले तरी त्यांत
नवल कोणतें ? भ्रमर गुंगतो माझा जर तेथ !
कळ्या उमलती, पुष्पें बनती जरि जागोजाग
भ्रमरा परि मम आनंदाची आवडली बाग !
लहानपणाची साधीभोळी प्रेमळ परी गाणीं
तिथें गाइली भ्रमरें; फुलल्या कलिका उद्यानीं !
गतस्मृतीनें अजुनी तेथें प्रेमे तो गुंगे
नवल कोणतें मन्मन जरि गे स्थलीं त्याच रंगे ?

# स्वप्नाचा पडताळा.

( चाल—सुकुमार, असुनि तूं फार )

प्रियकरा !
विरह आपला
ताप दे मजला
ना चैन, लागलें विरह-वेड चित्ताला ! ॥ १ ॥

जी हृदीं
मूर्ति आपली
ठेविली नाथा
ती स्मरुनी निजले करुनी अश्रूंपाता ॥ २ ॥

दाटुनी
प्रेम मन्मनीं
रंगले त्यांत
तों स्वप्न पाहिलें मोद होइ हृदयांत ॥ ३ ॥

वा. ३०५ ३१८

विहरती
रम्य उपवनीं
भृंग कलिकाशीं
पाहुनी दाटली इच्छा मन्मनिं तैशी ? ॥ ४ ॥

पाहिली
फुलें चांगली
रम्य बकुलाची
तीं गोळा करुनी माळ गुंफिली त्यांची ॥ ५ ॥

परि हाय !
आपले पाय
दिसति ना मजला
मग वाटे माला अर्पूं ही कोणाला ? ॥ ६ ॥

खिन्नता
हृदीं पसरतां
नकोशी झाली
ती माळा मजला फेकाया वर धरिली ॥ ७ ॥

वर परी
हात कुणि धरी
मागल्या मागें
हें कळतां मजला; वळलें मी अनुरागें ! ॥ ८ ॥

जमविली
फुलें; गुंफिली
माळ ज्यांसाठीं
मम आस पुरे ती–पडली त्यांच्या कंठीं ! ॥ ९ ॥

वेष्टिले
अश्रुं ढाळिले
प्रमोदें फुलुनी
ते पडतां गालीं जागृति ये परतोनी ! ॥ १० ॥

तों कुणी
पत्र आणुनी
देइ हातांत
स्वप्नाचा पटला पडताळा हृदयांत ॥ ११ ॥

# प्रेमाची बाग.

चाल—त्रिखंड हिंडुनि.

आवडती माझी बाग
फुललि फुलें जागोजाग !
गुलाब चाफा जाइजुई
बागडती ठायीं ठायीं !
भ्रमर गुंगती चौफेर
प्रेमाचा धरिती फेर
पूर्वी होत्या ज्या बाला
कलिका त्या मग विकासल्या !
विनयशालि बघण्या बाला
भ्रमरांचा मेळा जमला
कलिकाही लज्जित झाल्या
बालांच्या तरुणी बनल्या !

*          *          *

प्रेमाचा संगम झाला
जगताला भरुनी उरला !
वृक्ष लतांचे हृदय भरे
कोकिल गाई प्रेमभरें

ओढ्याचा झुळझुळ नाद
गाण्याला देई साद !
प्रेमाचे अश्रू पडले
तृणांकुरांवर चमचमले !
भूवरचें अमृत प्याया
रविकर आले त्या ठाया !

❀ ❀ ❀

दृश्य बघोनी मन वेडें
झालें माझें क्षणीं गडे
प्रीतिलता हृदयीं फुलली
मधुर फुलांनीं रसरसली
देहभान क्षणभर गेलें
प्रेमाच्चीं तल्लिन झालें !
विचार आले हृदयिं किती
प्रेमाची कोणा गणती ?
तरंग नाना परी जरी
प्रीतीच्या सार्‍या लहरी !
वस्त्रें होती भिन्न जरी
बाला आंतिल एक परी !

❀ ❀ ❀

गुंग होऊनी दृश्यांत
उभी राहिले तें बघत !

कालाचें भानही नुरलें
इतराचें आलें कुठलें ?
प्रेमचि खेळे चौंहिकडे
हृदयीं त्याचें पिसें जडे !
भरूनी राही विश्वाला
सोडिल तें कां हृदयाला ?
गुणगुणलें कांहीं बाहीं—
सूर सुराला मी देई
गाणें तें मी ना रचलें
हृदयांतुन आपच स्फुरलें !

* * *

वेळ लोटला किती तरी
भान राहिलें कुणा परी ?
किती दचकलें मी बाई—
मग मागें वळलें घाई !
तिकडचेंच येणें झालें
प्रीति-चिन्ह गालीं उठलें
मज घेतां जवळी वदलें—
हें कायहि भलतें असलें
शब्द निराळे—कृती परी—
शब्दाहुनि ती भिन्न खरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२५७०

# कोली हर्षी.

चाल—त्रिखंड हिंडुनि

उद्यानें जागोजाग
आवडते मज ही बाग !
देश किती या पृथ्वींत
सकलांचें एकच चित्र !
तारा सुंदर
फुलें मनोहर
मनुजें प्रेमळ
असती साऱ्या देशांत
मायदेशिं रिझतें चित्त !

[ २ ]

सुंदर पुष्पें सर्वत्र
सकलांचें एकच चित्र !
कलिका फुलती
प्रेमें हंसती !
पुष्पें होती
कुठल्याही जरि बागेंत—
एकचि ठसली हृदयांत !

ग्रा. काव्य ३१८

[ ३ ]

भ्रमर गुंगती सर्वत्र
सकलांचें एकचि चित्र !
कलिकांभंवती
ते बागडती !
गाणीं गाती !
वेड लाविती सर्व जरी
एकच खेळे हृदयिं परी !

[ ४ ]

सुंदर बाळें सर्वत्र
सकलांचें एकच चित्र !
आई वदती
गळां बिलगती
चुंबन घेती !
कुठल्याही संसारांत
मातेला प्रिय तत्पुत्र !

[ ५ ]

रम्य गृहें जरि सर्वत्र
हृदयिं ठसे एकचि चित्र !
गाई गीतें
पति मम जेथें !
बाळ हांसतें !
घरकुल तें मज आवडलें
प्रासादा मम मन विटलें !

# श्रेष्ठ कोण-धरा कीं स्वर्ग ?

चाल—चंद्रकांत राजाची.

एके दिवशीं आनंदानें निद्रित असतां मी
दिव्य पुरुष मम स्वप्नीं आले दोन बहू नामी ! १
अवचित पुढती त्या दोघांना पाहुनि मम हृदयीं
धडकी भरली, कोण असति ते न कळे त्यासमयीं ! २
भीतियुक्त मम वदन पाहुनी एक मला बोले—
'देवदूत गे ! दुजे न कोणी-भीति सोड बाले' ! ३
वचन ऐकुनी त्या दूतांचे आनंदित झालें
देवदूत ते म्हणुनी त्यांना वंदन मी केलें ! ४
दूत पुढें तो बोले मजला प्रेमळ वाणीनें—
"स्वर्गी तुजला न्याया आलों प्रभुच्या आज्ञेनें ! ५
दुःख संपले सर्व तुझें; तूं स्वर्ग सौख्य भोग
सौख्यास्तव ज्या मुनिजन करिती जपतपादि योग !" ६

---

* ही कविता आजारी पडण्यापूर्वी दोन महिने अगोदर लिहिली गेली. भावि योगायोगाचें मनाला स्वप्न पडलें म्हणावयाचें !

वचन ऐकतां धडकी भरली माझ्या हृदयांत
शब्द फुटेना, न कळत आले अश्रू नयनांत ! ७
दूतांचें त्या दर्शन झालें म्हणुनी हर्ष मला
झाला; गेला परि ऐकोनी निष्ठुर वचनाला ! ८
हात जोडुनी करुणरवानें बोले मी त्यांना—
" कशी सोडुनी येऊं माझ्या प्रियकर नाथांना ? ९
लहान परि या रम्य उपवनी कांतासह बसुनी
गोष्टी करितां तुच्छ वाटती स्वर्ग इंद्र दोन्ही !" १०
" मुली, किती तूं वेडी कांहीं समजेना तुजला
बरोबरी त्या स्वर्गाची कां येइल पृथ्वीला ! ११
स्वार्थी प्रेमा उपमा देशी स्वर्गिय प्रेमाची
ओळख नाहीं त्या स्वर्गाला असत्य भाषेची ! १२
मर्त्य–लोकचा मोहपसारा नश्वर हा सारा
स्वर्गावरती किती वाहती प्रेमामृत धारा ! " १३
वदलें मी त्यां झिडकारोनी–"लाभो तुम्हाला
स्वर्ग–सौख्य तें; नाथ जिथें तो स्वर्ग गमे मजला ! १४
एक तयांचा शब्द ऐकतां सौख्याचा हृदयीं
प्रवाह वाही ! अमृत उपमा योग्य तया नाहीं ! १५
श्रेष्ठ अशा या सुखप्रवाहीं प्रेमानें रमतां
कसें रुचावें तुम्हीच सांगा त्यजणें या जगतां ! १६

अवमानोनी मम वचनाला मजला स्वर्गाला
नेऊं लागले—ओरडले मी-कंप किती सुटला ! १७

धरिलें हृदयीं प्रेमभरानें कोणी तितक्यांत
वदणें झालें—'भीति वाटली तुज कां स्वप्नांत ? १८

नको घाबरी होऊं सखये आहे मी जवळी-'
भीति पळाली प्रीति दाटली ओष्ठांना कळली ! १९

गमलें तेव्हां धरा श्रेष्ठ ही स्वर्गाहुनि खास
सदा असे जरि संतांना त्या स्वर्गाचा ध्यास ! २०

समाप्त.

REFBK-0018504
REFBK-0018504

प्रकाशकः-नारायण केशव बेहेरे, भंडारा. सी. पी.
मुद्रकः-पांडुरंग नारायण जव्हेरी,
" श्री विनय प्रिंटिंग प्रेस, "
७, नवरोजी स्ट्रीट,
ठाकुरद्वार,
मुंबई.